# महाराष्ट्र शासन

## उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर

DEPUTY DIRECTOR OF HEALTH SERVICES KOLHAPUR CIRCLE KOLHAPUR

| | | |
|---|---|---|
| उपसंचालक दूरध्वनी क्र (वै)<br>एन एच एम कक्षः- | २६५९९०१<br>२६६७५५७ | उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर.<br>मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, कसबा बावडा रोड,<br>डी.एस.पी.ऑफीस जवळ, कोल्हापूर - ४१६ ००३.<br>ई-मेल ddhs_kop@yahoo.co.in , ddhskol@rediffmail.com |
| आरोग्य सेवा | जा.क्रं.उसंआसेको/भांडार/रुग्णवाहीका दुरुस्ती खर्चास तांत्रिक मंजुरी बाबत/ 20531-35 /२०२५<br>दि- ३० /०९/२०२५ | |


प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,

कोल्हापूर.

विषय :- जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत अनुदानातुन ०२०२ रुग्णवाहीका देखभाल दुरुस्तीच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- १) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रं. भांखस - २०१४/ प्र.क्र.८२/भाग-३/ उदयोग-४, दि.१.१२.२०१६.

२) सार्वजनिक आरोग्य् विभाग, शासन निर्णय क्रं.अर्थसं २०२०/प्र.क्र.७३/अर्थसंकल्प्, दि.०९.११.२०२१.

३) सार्वजनिक आरोग्य् विभाग शा.नि.क्रं.संकीर्ण२०२३/प्र.क्र.१८६/आरोग्य् ३ दि.१३.१०.२०२३.

४) सार्वजनिक आरोग्य् विभाग शा.नि.क्रं.अर्थस-२०२०/प्र.क्र.७३/अर्थसंकल्प् दि.३०.०१.२०२४.

५) नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक-हिडएपी १०२५/प्र.क्र.३०५/का.१४८१, दि.०१.०८.२०२५.

६) मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक:डिएपी-१०२५/प्र.क्र.३५२/का-१४८१, दि.१२.०९.२०२५

७) मा.सहसंचालक, आरोग्य् सेवा, (प्रांआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांचे आदेश क्रं.आआसे/कक्ष-७अ/ जिवायोरुग्ण्वाहिका/तां.मा./प्रस्ताव/सुचना/४५०१/२०२४, दि.०९.१२.२०२४.

८) उपसंचालक, आरोग्य् सेवा (परिवहन) पुणे यांचे पत्र जा.क्र.-आसेप/कक्ष११८-III/जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६/रुग्णवाहीका देखभाल दुरुस्ती प्रस्ताव/तांत्रिक मान्यता/११३२३-२७/२०२५, दि.०२.०९.२०२५.

९) उपसंचालक, आरोग्य् सेवा (परिवहन) पुणे यांचे पत्र जा.क्र.-आसेप/कक्ष११८-III/जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६/रुग्णवाहीका देखभाल दुरुस्ती प्रस्ताव/तांत्रिक मान्यता/११३७४-७८/२०२५, दि.०३.०९.२०२५.

१०) उपसंचालक, आरोग्य् सेवा (परिवहन) पुणे यांचे पत्र जा.क्र.-आसेप/कक्ष११८-III/जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६/रुग्णवाहीका देखभाल दुरुस्ती प्रस्ताव/तांत्रिक मान्यता/११४४९-५३/२०२५, दि.०४.०९.२०२५.

११) या कार्यालयाची दि.१७.०९.२०२५ रोजीची समिती बैठक.

१२) या कार्यालयाची दि.१८.०९.२०२५ रोजीची टिप्पणी.

उपरोक्त् विषयांन्वये संदर्भ क्रं.२ च्या शासन निर्णय् सार्वजनिक आरोग्य् विभाग, शासन निर्णय क्रं.अर्थसं २०२०/प्र.क्र.७३/अर्थसंकल्प्, दि.०९.११.२०२१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांन्वये जिल्हा नियोजन समितीच्या योजनांवरील खर्चास तांत्रिक मान्यता देणेचे अधिकार उपसंचालक आरोग्य् सेवा (परिमंडळे) यांना दिलेले असल्याने व संदर्भ क्रं.८ व १० चे उपसंचालक, आरोग्य् सेवा (परिवहन) पुणे यांच्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या शिफारशीनुसार तसेच संदर्भ क्रं.५ व ६ च्या शासन निर्णय/शासन पत्रातील पत्रातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यामध्ये दिलेल्या निर्देशनानुसारच अनुदान खर्च करणेस तांत्रिक मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्रं. | वाहनाचा प्रकार | रुग्णवाहिका क्रमाक | वाहन धारक | स्तीसाठी अंदाजित रक्कम रुपये | अंदाजपत्रक सार्वधारण वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | टाटा विंगर (रुग्णवाहीका) | MH-०९-FL-१२६७ | वैदयकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय शिरोळ | ६९,४८४/- | (सदरच्या रुग्णवाहीकेना नविन टायर्स खरेदी ही उपसंचालक, आरोग्य् सेवा, परिवहन, पुणे यांच्या पत्रामध्ये नमुद परिशिष्ट अ नुसार) |
| २ | फोर्स ट्रॅक्स् क्रुजर (रुग्णवाहीका) | MH-०९-GJ-४०६३ | वैदयकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय चंदगड | १०,६१७/- | |
| ३ | फोर्स ट्रॅव्हलर (रुग्णवाहीका) | MH-०९-FL-२८७७ | वैदयकिय अधिक्षक, | २६,९५८/- | |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वराहत रुग्णालय गांधीनगर | | सोबत जोडलेले आहेत. |
| | | | एकुण रुपये | १,०७,०५१/- | |

तसेच उपरोक्त् प्रस्तावास खर्चास तांत्रिक मान्यता मिळाली म्हणजे उपरोक्त् कामास हरकत नाही असे न समजता प्रत्यक्ष प्राप्त् अनुदान विचारात घेऊन नंतरच त्याबाबतची कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत,

१) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रं. भांखस - २०१४/ प्र.क्र.८२/भाग-३/ उदयोग-४,दि.१.१२.२०१६ च्या खरेदीच्या शासन निर्णयाचे काटेकोरपणे अवलोकन करुन त्यामधील अटी व शर्तीनुसारच करण्यात यावी.

२) सदरची खरेदी ही विहित पदध्तीने पंचसुत्री नियमांचे पालन (वस्तु व सेवांची मागणी, अनुदान उपलब्धता, गुणवत्ता/तांत्रिक विनिर्देश, विहित समितीव्दारे मान्यता, विनियोगाची हमी/बाजारभाव) यांची खातरजमा करुन त्यानुसार खरेदी करीता काटेकोरपणे पालन करावे व त्याची जबाबदारी ही जिल्हा शल्य चिकित्सक,कोल्हापूर यांची राहील.

३) सार्वजनिक आरोग्य् विभाग, शासन निर्णय क्रं.अर्थसं २०२०/प्र.क्र.७३/अर्थसंकल्प्, दि.०९.११.२०२१ शासन निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे संबंधीत अधिकारी यांची प्रशासकिय मान्यता असणे आवश्यक आहे.

४) सदर साहीत्य् सामुग्री खरेदी ही सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या निधीपैकि अखर्चित राहणा-या निधीमधुन जिल्हा नियोजन समितीव्दारे प्राप्त् अथवा प्राप्त् होणा-या अनुदानाच्या मर्यादेतच खरेदी करावी. तसेच या कार्यालयामार्फत अथवा मा.संचालनालयामार्फत खरेदीकरीता कोणतेही अनुदान वितरीत केले जाणार नाही.

५) उपरोक्त् प्रस्तावातील कामे वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय/शासन आदेश/परिपत्रके/सुचनांच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. यामध्ये कोतीही अनियमितता झाल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार संबंधीत जिल्हा शल्य चिकित्सक,कोल्हापूर हे राहतील.

६) ज्या योजनेंअंतर्गत ज्या संस्थेस, ज्या प्रयोजनासाठी मंजुर प्राप्त् झालेला निधी तसेच मंजुर प्राप्त् होणारा निधी त्याच संस्था व प्रयोजनासाठी खर्च करणे तसेच खर्च हा प्रत्यक्ष निधीच्या मर्यादेतच करणे बंधनकारक आहे.

७) सदर योजनेच्या सन २०२५-२६ मध्ये अंमलबजावणीवर, खर्चावर तसेच सर्व तांत्रिक बाबींवर जिल्हा शल्य चिकित्सक,कोल्हापूर हे जबाबदार राहतील.

८) सदर साहीत्य् खरेदीचे सन २०२५-२६ मध्ये खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, पुर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इ. अहवाल या कार्यालयास तसेच मा.संचालक, आरोग्य् सेवा, मुंबई यांना सादर करणेस जिल्हा शल्य चिकित्सक,कोल्हापूर हे जबाबदार राहतील.

९) सन २०२५-२६ सदर खरेदी मध्ये खर्चाचे गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती इ. बाबींबाबत माहिती सादर करण्याची /कार्यवाही करण्याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक,कोल्हापूर यांची राहील.

१०) तरी उपरोक्त् प्रस्तावाविषयी खर्चास तांत्रिक मान्यता ही संदर्भिय शासन निर्णय तसेच शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकांन्वये शासन मान्य् Specification नुसारच व त्यामधील अटीं व जिल्हा शल्य चिकित्सक,कोल्हापूर यांनी सेवा व्यवस्थापन, विभागीय कार्यशाळा (परिवहन) कोल्हापूर व संबंधित जिल्हयाचे सेवा अभियंता यांचेशी समन्वय सांधुनच रुग्णवाहीका देखभाल व दुरुस्तीची कार्यवाही करण्यात यावी.

११) संदर्भ क्रं.५ व ६ चे शासन निर्णय/शासन पत्रांन्वये नियतव्ययाच्या खर्च हा मर्यादेत करणे बंधनकारक राहील. सदर प्रमाणे खर्चास संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक,कोल्हापूर हे जबाबदार राहतील.

१२) तसेच सदरचे साहीत्य् हे विनावापर पडुन राहणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

१३) तरी उपरोक्त् प्रस्तावाविषयी खर्चास तांत्रिक मान्यता ही संदर्भिय शासन निर्णय तसेच शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकांन्वये रुग्णवाहीका देखभाल व दुरुस्तीही त्यामधील अटीं व शर्तीनुसारच व त्यांचे काटेकोरपणे पालन करुन त्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

डॉ.दिलीप माने
उपसंचालक, आरोग्य सेवा,
कोल्हापुर मंडळ, कोल्हापुर

प्रत माहितीसाठी सविनय सादर :- मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर.
प्रत माहितीसाठी सविनय सादर :- मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (प्राआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई.
प्रत सस्नेह:- उपसंचालक, आरोग्य् सेवा (परिवहन) पुणे.
प्रत :- सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा (परिवहन) कोल्हापुर.

कोल्हापूर.
आवक क्रं. १०८
दिनांक ९/१०/२५
वरिष्ठ लिपिक
सेवा व्यवस्थापक